## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४७९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०७/२०१७

**१) महिलेचा विनयभंग करून धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:-**

दिनांक २९/०६/२०१७ चे १९.४५ वा. दर. यातील फिर्यादी ही घरी जेवन करून छपरात दार बंद करून झोपली असता यातील अरोपीने घरातील किचन रूमची खिडकीची जाडी काढुन घरातुन छपरात फिर्यादीचे खाटेजवळ येवुन फिर्यादीला जाग आल्याने आरोपीस ओळखुन कशाला आलास असे हटकले असता आरोपीने फिर्यादीच्या अंगाला बिलगुन विनयभंग केल्याने व धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४,(अ),४५१,३२३,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) महिलेला लज्जास्पद शब्दात शिवीगाळ करून धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:-**

दिनांक ३०/०६/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपले नातीन सोबत रोडने घराकडे जात असतांनी आरोपीने फिर्यादीस बोलावुन थांबवुन 'तुम्ही बाथरूम वापरू का देत नाही' या कारणावरून रोडवर अश्लिल शब्दात शिवीगाळ करून लज्जास्पद बोलुन धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,(अ),(१),(४),५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) रोडावर कचरा फेकण्याचे कारनावरून महिलेला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्या-पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:-**

दिनांक २७/०६/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून सार्वजनिक रोडवर कचरा फेकण्याचे कारणा वरून सार्वजनिक रोडावर फिर्यादीस व तिचे पतीस आरोपी क्र. १,२ व ३ ने अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ५०९,२९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा मनघटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) टाटा सुमो चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकला धडक देवुन एका गंभिर जखमी तसेच दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:-**

दिनांक ३०/०६/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी अतुल राजु भुरे वय २० वर्ष रा. भंडारा हा त्याचे होंडा ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच ३६ डब्लु ६२१४ वर जखमी कल्पना भुरे वय ४० वर्ष व कु. दिक्षा भुरे वय १८ वर्ष यांना बसवुन एनएच ६ रोडने लाखनी वरुन भंडारा कडे येत असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक देवुन फिर्यादी सोबत बसलेली आई व बहीणीला किरकोळ जखमी व फिर्यादीस गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने तसेच अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १३४/१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) जंगलातील कॅन्डीबॅक कंपनीच्या ट्रप कॅमेऱ्याची चोरी. .:-**

दिनांक ०३/०६/२०१७ ते २७/०६/२०१७ दरम्यान यातील भोंडकी जगलातील ०१ कॅन्डीबॅक कंपनीचा ट्रप कॅमेरा नं. बी. एच-८२ लिहीलेला किंमती अंदाजे २०,०००/-रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी ऊमशकुमार ग्यानीराम रहांगडाले वय २७ वर्ष, रा. वनवसाहत तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**६) स्कॉपीओ चालकाने आपले ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवुन गाडीवरील नियत्रंण सुटुन गाडी पलटी होवुन एकाचा मृत्यु व स्वत: व सोबत असणाऱ्यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक ३०/०६/२०१७ चे २१.०० वा. दर. यातील फिर्यादी शंकर सुधाकर नारनवरे वय ३१ वर्ष रा. वार्ड क्र. १ नागभिड जिल्हा चंद्रपुर हा त्याचे इतर दोन मित्र १) योगेश माकडे २) पंकज तिल्लमवार यांचेसह आपले वाहन स्कॉपीओ ने यातील फिर्यादी हा स्वत: गाडी चालवीत नागभिड वरुन पवनी कडे येत असतांना रस्त्यात पाऊस पडत असताना व रस्ता ओला असल्याने समोरचे वाहनाला साईड देण्यासाठी फिर्यादी चालकाने गाडीचा अचानक ब्रेक मारल्याने त्याचे गाडीवरील नियत्रंण सुटुन गाडीचे संतुलन बिघडुन रस्त्याचे बाजुला गाडी पलटी होवुन आरोपी फिर्यादी चालक हे स्वत: जखमी होवुन पंकज तिल्लमवार वय २५ वर्ष, रा. नागभिड हा जागीच मरण पावल्याने व योगेश यास किरकोळ जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने आरोपी फिर्यादी चालकांचे बयानावरुन व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) जंगलातील कॅन्डीबॅक कंपनीच्या ट्रप कॅमेऱ्याची चोरी. .:—**

दिनांक ०३/०६/२०१७ ते २७/०६/२०१७ दरम्यान यातील भोंडकी जगलातील ०१ कॅन्डीबॅक कंपनीचा ट्रप कॅमेरा नं. बी. एच—८२ लिहीलेला किंमती अंदाजे २०,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी ऊमशकुमार ग्यानीराम रहांगडाले वय २७ वर्ष, रा. वनवसाहत तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**८) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक ३०/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे मोहाडी व तुमसर येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३७ लिटर हातभट्टी दारु किंमती २८५०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ३०/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.